# भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविदयालय व रूग्णालय नंदनवन नागपूर

## लसीकरण केन्द्राचा कामाबाबतचा अहवाल

भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविदयालय व रूग्णालय नंदनवन नागपूर येथे दिनांक 08.03.2021 पासून नागपूर महानगरपालिकेव्दारा कोव्हीड–19 या महामारीसंबंधीत लसीकरण केंद्र जनहिताकरिता सुरू करण्यात आले होते. परंतु दि 08/05/2021 पासून DEDICATED COVID HEALTH CENTER तयार करण्यात आल्याने बंद करण्यात आले.

याकरिता आवश्यक साहित्य व इतर सोईसह जागा देण्यात आली होती. या केंद्रावर महानगर पालिकेतील आवश्यक कर्मचारी वर्ग वैदयकिय अधिकारी, नर्सेस, आया वर्कर्स इ.ची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालयातील प्राचार्य, अधिष्ठाता, निवासी वैद्यकीय अधिकारी, इतर वैद्यकीय अधिकारीवर्ग, नर्सेस, अटेंडट तसेच इ.कर्मचारी वर्ग लसिकरण कार्यात सहभागी होते.

लसीकरण केंद्रात आजपर्यंत 7530 लोकांना लसीकरण करण्यात आले. लसिकरण केंद्राला महापौर श्री. दयाशंकर तिवारी, उपमहापौर मनिषा धावडे, नगरसेवक किशोर कुमेरिया, चकोले इ. नी भेटी दिल्या. म्युनसिपल कॉर्पोरेशन कमिश्नर राधाकृष्णन बी. यांनी केंद्राला भेट दिली. व पाहणी केली. या सेंटरवर सकाळ सांयकाळ दोन्ही वेळेस सॅनिटायझेशन केले जात होते व सोशल डिस्टेंसिंग चे पालन कले जात होते तसेच लाभार्थ्यांना अन्य आवश्यक सुविधा पुरवण्यात येत होत्या.